# बृहन्मुंबई महानगरपालिका

**अनुज्ञापन खाते**

## जाहिरातीचा मसुदा

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रासाठी नगर पथविक्रेता समिती गठित करावयाची असून नगर पथविक्रेता समितीमधील सदस्यांपैकी पथविक्रेत्यांचे प्रतिनिधी व्यतिरिक्त अन्य सदस्यांची नगर पथविक्रेता समिती गठित करण्याबाबत शासनाने निर्देश दिलेले आहेत. महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र. बीएमसी-२५१६/प्र.क्र.१५१९/२०१६/नवि-२१,दि.०९ जानेवारी, २०१७ अन्वये पथविक्रेता (उपजिविकेचे संरक्षण व पथविक्री विनियमन) योजना, २०१७ प्रसिद्ध केली आहे. त्यानुसार महाराष्ट्र पथ विक्रेता (उपजीविकेचे संरक्षण व पथ विक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम, २०१६, मधील नियम ११(२)(ख)(दोन) ते (पाच) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रवर्गातील संघटनांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या व्यक्तीची नगर पथविक्रेता समितीवर नियम १२ मध्ये घालून देण्यात आलेल्या निकषाच्या आधारावर सदस्य नेमणूक करण्याकरिता खालील प्रवर्गातील नमूद संघ व संघटनांचे प्रतिनिधत्व करणाऱ्या व्यक्तीकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

| नियम | अ.क्र. | इतर मंडळे | |
|---|---|---|---|
| नियम ११(२) (ख) | १ | (दोन) अशासकीय संघटना आणि समुदाय आधारीत संघटना (Non Government organisation and community based organisations) | ०२ |
| | २ | (तीन) निवासी कल्याण संघ (Resident Welfare Associations) | ०२ |
| | ३ | (चार) व्यापारी संघाचा प्रतिनिधी (Representative of Traders Association) | ०१ |
| | ४ | (पाच) पणन संघाचा प्रतिनिधी (Representative of Market Association) | ०१ |

खालील अटींची व शर्तींची पूर्तता करणाऱ्या संघटनेचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या व्यक्तींनी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, अनुज्ञापन अधीक्षक यांचे कार्यालय, दादर उदंचन केंद्र, ६ वा मजला, मलनि:सारण प्रचालन प्रशासकीय इमारत, २४९, सेनापती बापट मार्ग, दादर (प.), मुंबई - ४०००२८ येथे ही जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसाचे आत आवश्यक कागदपत्रासह लेखी अर्ज सादर करावेत. मुदतीनंतर आलेल्या व अपूर्ण कागदपत्रासह सादर केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**अटी / शर्ती:-**

१. संघटनेची किंवा संघाची नोंदणी, क्षेत्रातील सक्षम प्राधिकरणाकडे केलेली असावी.

२. संघटना किंवा संघ मागील तीन वर्षांचे सक्षम प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेले लेखापरीक्षा अहवाल सादर करील.

३. संघटनेस किंवा संघास स्थानिक प्राधिकरणाने काळ्या यादीत टाकलेले नसावे.

४. संघटना किंवा संघ त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये सिद्धदोषी असणार नाहीत.

५. संघटना किंवा संघ यांना त्यांनी सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केल्याच्या त्यांच्या प्रवर्गामधील कामाचा किमान पाच वर्षांचा अनुभव असावा.

मा. आयुक्त तथा अध्यक्ष नगर पथविक्रेता समिती,
तथा बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांचे मान्यतेने

सही/-
अनुज्ञापन अधीक्षक
बृहन्मुंबई महानगरपालिका

तत्पर मुंबई - सुसज्ज मुंबई

PRO/297/ADV/2017-18